# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** जुना राजवाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0550 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/08/2024 00:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 20/08/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/08/2024
**Time From (वेळेपासून):** 10:53 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/08/2024 **Time (वेळ):** 00:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/08/2024 00:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन कार्यालय, 852/8 बी वार्ड, ,रघूकुल बिल्डींग,सुभाष रोड,कोल्
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शेखर संराव दामुगडे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : संराव दामुगडे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फुलेवाडी-बालिंगे रोड,शिवतेज हाटेलचे पाठीमागे,नागदे,नागदेवाडी ताकरवीर, जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फुलेवाडी-बालिंगे रोड,शिवतेज हाटेलचे पाठीमागे,नागदे,नागदेवाडी ताकरवीर, जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329850894

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास रोहीदास सोनवणे | | वडील का नाम : रोहीदास सोनवणे | 1. ए 102 लाईफ स्टाईल अपार्टमेंट,प्रतिभानगर कोल्हापूर ,जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये 45,000/ त्यामध्ये 500 रु दराच्या 90 चलनी नोटा | 45,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

45,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 21/08/2024

मी श्री शेखर रंगराव दामुगडे, वय 31 वर्षे,धंदा- व्यवसाय, रा.फुलेवाडी-बालिंगे रोड, शिवतेज हाॅटेलचे पाठीमागे, नागदेवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर मुळगांव मु.पो.घानवडे ता.करवीर जि.कोल्हापूर मो.नं. 8329850894 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 19/08/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस निरीक्षक श्री.बापू साळूंके यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझा व भागीदार अनिल कुंभार रा.महे ता.करवीर जि.कोल्हापूर असे आमचा टेस्ट मॅटर्स/शेखर रंगराव दामुगडे आणि अनिल आनंदा कुंभार या नावाची फर्म 1011 कोगे-महे रोड,एमएससीबी आॅफीसजवळ,कोगे ता.करवीर जि.कोल्हापूर येथे असून त्याचा परवाना क्रमांक 11520042000029 असा आहे.आंम्ही फरसाण,व वेफर्सचे उत्पादन करण्याचा व्यवसाय करतो े. दि.05/08/2024 रोजी मी व भागीदार असे बाहेर असताना अन्न सुरक्षा अधिकारी श्री सोनवणे हे आमच्या फर्ममध्ये तपासणीसाठी आले होते.त्यांनी बेसन, तेल ,मिरची पावडर, मका चिवडा,शाबू चिवडा यांचे सॅम्पल घेवून नोटीस दिली होती.त्यांनी दिलेल्या नोटीसबाबत मी तसेच माझे मित्र आमचे डिलर ओंकार सावर्डेकर, अनिल कुंभार असे चैकशी करण्याकरीता दि.19/08/2024 रोजी सकाळी 11.00 वा.चे सुमारास अन्न व औषध प्रशासन कोल्हापूर येथे जावून अन्न सुरक्षा अधिकारी श्री.सोनवणे यांना भेटलो.त्यावेळी श्री सोनवणे यांनी मला आमचे फर्ममधून घेतलेल्या सॅम्पलवर कोणतीही कारवाई न करणेकरता व फर्मचा परवाना रद्द न करणेसाठी 85,000 रू.मागणी केली.त्यावेळी मी काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी 45,000 रू.ची मागणी केली. व सहा महिन्याला 12,000 रू.हप्ता द्यावा लागेल असे सांगितले. अन्न सुरक्षा अधिकारी श्री सोनवणे हे मागणी करत असलेली रक्कम ही लाच रक्कम असलेची माझी खात्री झाल्याने अन्न सुरक्षा अधिकारी श्री सोनवणे यांना 45,000/- रुपये तसेच सहा महिन्याला 12,000/-रू. हप्ता म्हणून लाच देणेची माझी इच्छा नाही. मी त्यांना उदया दि.20/08/2024 रोजी सकाळी 11.00 वा.भेटण्यास जाणार आहे.तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार दिली. त्यानंतर साळूंके साहेबांनी मला दि.20/08/2024 रोजी सकाळी 10.00 वा.त्यांचे कार्यालयामध्ये हजर राहणेबाबत सांगितले.त्याप्रमाणे मी सकाळी अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयामध्ये हजर झालो. त्यावेळी साळूंके साहेबांनी कार्यालयात हजर असलेल्या दोन पंचाना त्यांचे केबिनमध्ये बोलावुन घेतले. त्यानंतर आमची दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना वरील तक्रार सांगितली. साळूंके साहेबांनी त्यांचे कार्यालयामधूनच पडताळणी कारवाई करणार असल्याचे सांगीतले. व त्यांच्याकडील व्हाईस रेकाॅर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन अन्न सुरक्षा अधिकरी श्री सोनवणे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना देवुन व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझ्याकडे दिला. मला व पंच नं.1 कोरडे यांना सोनवणे यांना भेटणेकरीता पाठविले. मी व पंच नं.1 असे सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन कार्यालय,कोल्हापूर येथे श्री सोनवणे यांना भेटलो.त्यावेळी आमचेत सोनवणे साहेबांच्या मॅडमनी दिलेल्या सुधारणा नोटीस बाबत चर्चा झाली व नोटीसप्रमाणे सुधारणा करण्याकरीता जास्तीचा कालावधी मिळावा याकरीता पत्र देण्याबाबत सोनवणे यांनी सांगितले. त्यावेळी मी मॅडमना भेटतो असे म्हणालो आसता सोनवणे साहेबांनी मी बोलून घेतो ते होवून जाईल काय विषय नाही असे म्हणाले.त्यानंतर सोनवणे यांनी आमचे फर्ममधून घेतलेल्या सॅम्पलबाबत बोलणे झाले. त्यावेळी मी त्यांना

चालेल सर मग करून घेतो काल ठरल्या प्रमाणे आपले 45000 मी तुम्हाला आज देतो आणि ते फक्त सहामाही हप्त्याचं एक तारेखेच्या नंतर देतो असे म्हणालो त्यावेळी सोनवणे साहेबांनी ते आपलं ठरलच की एक तारखेच्या नंतर असे म्हणून हाताने पैशाबाबत इशारा करून दुपारी आं◌ेकारकडे करून टाका असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाही असे म्हणून मी येवून देवून जाईन ओ असे म्हणालो त्यावेळी सोनवणे साहेबांनी मी कार्यालयात नसलो तर फोन कर मला असे म्हणाले होते.त्यानंतर मी, पंच नं.01 परत येवुन साहेबांना वरील हकीकत सांगितली.

त्यानंतर साळूंके साहेबांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अं◌ॅथासिन लावलेले 45,000/- रूपये माझेकडील पांढ-या रंगाचे कापडी पिशवीमध्ये ठेवले. त्यानंतर साळुंके साहेबांनी रेका◌ॅर्डर सुरू करून ते माझेकडे दिले व त्यांचे सुचनेवरून मी व पंच नं.01 कोरडे माझे मोटरसायकलने निघालो. माझे पाठोपाठ साळं◌ुके साहेब, सापळा पथक, पंच नं.2 आले व सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन कार्यालय,सुभाष रोड,कोल्हापूर या कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी पंच नं.01 कोरडे यांना बाहेरच गॅलरीमध्ये थांबण्याचा इशारा केला व मी अन्न औषध प्रशासन कार्यालयामध्ये गेलो त्यावेळी मी सोनवणे साहेबांना आज कुठं व्हिजीटला नाही वाटत असे म्हणालो त्यावेळी सोनवणे साहेबांनी नाही उदया पुण्याला जायचे आहे प्रकरण दाखल करायला असे म्हणाले त्यावर मी त्यांना आपलं नाही ना त्यात असे विचारले त्यावर सोनवणे साहेबांनी अरे एकदा शब्द दिला की कसं होतया असे म्हणत त्यांचेकडील एक कागद दिला व पाकीट कर असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना पाकीट नाही असे म्हणालो त्यावर सोनवणे साहेबांनी मला बाहेर जा, गेटच्या बाहेर जा गॅलरीत नको असे म्हणून त्यांनी माझेकडे दिलेल्या कागदावरचा टंकलिखीत केलेला मजकूरचा भाग दाखवून हा वरती भाग कर,व कोरीबाजू दाखवून हा खाली असे म्हणून एकदा गुडांळ असे म्हणाले त्यावर मी त्यांना हितच असे विचारले त्यावर सोनवणे साहेबांनी पांढरा भाग वरती हं असे म्हणून माझेकडे असलेल्या पिशवीकडे हात करून त्याच पिशवीत घाल आणि ये हं असे म्हणाले त्यानंतर मी सोनवणे साहेबांनी दिलेला कागद घेवून त्यांचे कार्यालय असलेल्या इमारतीचे खाली आलो व सोनवणे साहेबांनी सांगितलेप्रमाणे त्यांनी दिलेल्या कागदामध्ये पांढरा कोरा कागद वर करून टंकलिखीत केलेल्या कागदामध्ये त्यांना देण्याकरीता आणलेले 45000/- रू.पिशवीमधून काढून कागदामध्ये गुंडाळले.व परत सोनवणे साहेबांचे टेबलजवळ गेलो.त्यावेळी मी माझेकडील पिशवीमधून 45000 रू. गुंडाळलेला कागद काढून सोनवणे साहेबांना दिला व साहेब पंच्चेचाळीस हजार हाईत असे म्हणालो त्यावेळी सोनवणे साहेबांनी ठिक हाय असे म्हणाले त्यावर मी त्यांना सागितलं कालचे ठरल्या प्रमाणे सगळे हाईत त्यावर सोनवणे साहेब हो हो असे म्हणाले व त्यांनी माझेकडून कागदामध्ये गुंडाळलेले 45000/- रू.घेवून त्यांचेकडील काळया रंगाचे सॅकमध्ये ठेवले.त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलणे चालु असताना मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता साळुंके साहेब त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह सोनवणे साहेब यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी आमचे टेस्ट मॅटर्स ,1011 कोगे- महे रोड,एमएससीबी आ◌ॅफीसजवळ,कोगे ता.करवीर जि.कोल्हापूर या फर्मला दि.05/08/2024 रोजी अन्न सुरक्षा अधिकारी श्री विकास सोनवणे यांनी व्हिजीट देवून फर्ममधील बेसन, तेल आणि मिरची पावडर, मका चिवडा,शाबू चिवडयाचे सॅम्पल घेवून नोटीस दिलेली होती.व घेतलेल्या सॅम्पलवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करणेकरीता व आमचे फर्मचा परवाना रद्द न करणेकरीता श्री विकास सोनवणे साहेबांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 85,000/- रू.ची मागणी करून तडजोडीअंती 45,000/- रू. व सहा महीन्याला 12,000/- रू.हप्ता मागणी केलेने त्यांना बेकायदेशीरपणे 45,000/- रूपये लाच स्विकारताना अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने 1) विकास रोहीदास सोनवणे वय 50 वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन,रघूकुल बिल्डींग,सुभाष रोड,कोल्हापूर रा.ए 102 लाईफ स्टाईल अपार्टमेंट, प्रतिभानगर कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJEEVKUMAR DATTARAYA ZADE(I (Inspector)) / 14601000450SDZM7601Y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
जुना राजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJEEVKUMAR DAT
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14601000450SDZM760